**<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची तिसरी यादी</u>**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पनवेल शहराच्या सुधारित नियोजन आराखड्याबाबत**

**(१) १६९१८ (२८-०४-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहराचा सुधारित नियोजन आराखडा (टीपी स्कीम) मंजूर होऊन तीन वर्षे होऊनही सदरील योजना पनवेल नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आराखडयाची नस्ती नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या लोकसंख्येचा ताण पनवेल शहराच्या पायाभुत सुविधांवर पडत असून रस्ते, गटारे यांसारख्या सुविधांचा विस्तार आणि विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१७) :** (१) व (२) नगर रचना योजना, पनवेल क्र.१ (प्रथम फेरबदल) (अंतिम) शासनाने दिनांक ३१/८/२००९ च्या अधिसूचनेन्वये मंजूर केली आहे. मंजूर नगर रचना योजनेचे नकाशे व स्कीम बुक अधिप्रमाणित करणे प्रलंबित होते. नगर विकास विभागाकडील सदर प्रकरणाची मूळ संचिका जून, २०१२ मध्ये मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये नष्ट झाली. त्यामुळे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून आवश्यक अभिलेखाच्या प्रती प्राप्त करुन घेऊन नगर रचना योजना पनवेल क्र.१ (प्रथम फेरबदल) (अंतिम) चे नकाशे व स्कीम बूक अधिप्रमाणित करुन दिनांक १२/१/२०१६ च्या पत्रान्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात आले आहे.

(३) व (४) पनवेल नगरपरिषद क्षेत्राची नगर रचना योजना तसेच विकास योजना मंजूर असून पनवेल नगरपरिषद (सध्याची पनवेल महानगरपालिका) त्यानुसार शहराचा विकास करु शकते.

---

**समान अंक, समान काम व समान तासिका हे धोरण राबविण्याबाबत**

**(२) १६९८४ (२९-०४-२०१६). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत हिंदी या भाषा विषयाबाबत तसेच इयत्ता ९ वी व १० वी साठी हिंदी या भाषेऐवजी व्यवसायाभिमुख शिक्षण, कार्यानुभव, ॲटोमोबाईल हे विषय ठेवण्याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे स्तरावर वेगवेगळे आदेश/परिपत्रके निर्गमित करण्यात आली असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत हिंदी भाषेसंदर्भात अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळाच्या संघटनेने समान अंक, समान काम व समान तासिका हे धोरण राबविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१७) :** (१) नाही. केंद्र शासनाच्या धोरणानुसार राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान मार्फत इयत्ता ९ वी व १० वी मध्ये व्यवसाय शिक्षण विषय शासकीय माध्यमिक शाळांमध्ये सुरु करण्यात आला आहे. धोरणाप्रमाणे सदर विषय हा इयत्ता ९ वी, १० वी मध्ये मुख्य विषय म्हणून घेणे अनिवार्य आहे.

(२) होय.

(३) शासन निर्णय क्र.व्य.शि.२०१५/प्र.क्र.८२/१५/एसडी-६, दिनांक १४/०५/२०१५ नुसार भाषा-२ अथवा भाषा-३ या विषयाऐवजी व्यवसाय विषय निवडण्याची तसेच शासन निर्णय क्र.व्य.शि.२०१६/प्र.क्र.१०६/१६/एसडी-६, दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ नुसार सर्व माध्यमांच्या विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्र या विषयाऐवजी व्यवसाय विषय निवडण्याची देखील मुभा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालवण (मुंबई) येथील एका तरुणाच्या हत्येच्या तपासाबाबत

**(३) १७२२६ (२८-०४-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (मुंबई) येथील गेट क्र. ६ न्यु कलेक्टर कंपाऊंड मधील एका चाळीत मार्बल पॉलीश करणाऱ्या २६ वर्षाच्या तरुणाची हत्या झाली असून पोलिसांनी एका महिलेस अटक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या गुन्ह्याच्या तपासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२/१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आलेली असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यातील अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कारवाई करण्याबाबत

**(४) १८५९९ (०३-०५-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात विविध मोबाईल कंपन्यांचे उभारण्यात आलेल्या टॉवर्सपैकी बरेचसे टॉवर्स अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात विविध मोबाईल कंपन्यांचे एकूण टॉवर्स किती आहेत व त्यापैकी किती टॉवर्सकरिता रितसर परवानगी घेतलेली आहे याची माहिती संकलित करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, ज्या मोबाईल टॉवर्सची परवानगी घेण्यात आलेली नाही अशा अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१७) :** (१) होय.

(२) होय. जिल्ह्यात एकूण मोबाईल टॉवर्सची संख्या ११३३ आहे. त्यापैकी ४१ मोबाईल टॉवर्सला परवानगी घेतलेली आहे.

(३) नाशिक जिल्ह्यातील एकूण ११३३ टॉवरपैकी १०९२ टॉवर्स अनधिकृत असून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ नुसार तालुकास्तर दंडात्मक कार्यवाही करुन वसुलीची कार्यवाही कार्यान्वित आहे.

अनधिकृत भ्रमणध्वनी मनोऱ्यांवर कारवाईचा भाग म्हणून महानगरपालिकेमार्फत सील लावण्यात आले होते परंतु मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे सील काढणेत आलेले आहेत. नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत भ्रमणध्वनी मनोऱ्यावर कारवाईबाबत मा.उच्च न्यायालयाने रिट पिटिशन २०४३/२०१४ व रिट पिटीशन २०४७/२०१४ मध्ये दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या मनाई आदेशानुसार पुढील कारवाई करता आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवणी (मुंबई) परिसरातील चोरीच्या घटनेबाबत**

**(५) १९०९९ (२८-०४-२०१६). श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी (मुंबई) परिसरातील गेट नं. ७ बालवाडीच्या समोर न्यु कलेक्टर कंपाऊंड येथे अखतरी मो.उमर शेख यांच्या घरी दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घरफोडी करुन चोरट्यांनी रुपये १ लाख ७७ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली असून मालवणी पोलीस ठाणे येथे दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रथम गुन्हा क्र. ७९५/२०१५ दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.७९५/१५ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेतील शिक्षकांना वेतन अनुदान मिळणेबाबत**

**(६) १९३८७ (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५ वर्षांपासून कायम अनुदान तत्वावरील शाळेत शिक्षक विनावेतन काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती शिक्षक विनावेतन काम करीत आहेत, तसेच माहे डिसेंबर, २०१५ च्या नागपूरच्या अधिवेशनात शिक्षकांचा मोर्चा निघाला तेव्हा शासनाचे अर्थसंकल्पात तरतूद करु असे उत्तर दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याविरोधात राज्यात शिक्षकांचे आमरण उपोषण सुरु आहे काय, त्यांना शासनाने किती दिवसात कायम विनाअनुदान शब्द वगळून वेतन अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

---

**विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेला निधीचा वापर न केल्यामुळे अखर्चित राहिल्याबाबत**

**(७) १९४१९ (२३-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या निधीचा वापरच न केल्यामुळे राज्यातील विद्यापीठांचा कोटयवधी रुपयांचा निधी पडून राहिल्याचे माहे मे, २०१६ मध्ये आयोगाने जाहिर केलेल्या आकडेवारीवरुन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश विद्यापीठांनी आतापर्यंत पन्नास ते साठ टक्केच निधी खर्च केला असून नागपूर आणि सोलापूर विद्यापीठांनी १० टक्केच निधीचा वापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठांनी निधीचा वापर न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "जनता" या साप्ताहिकातून केलेले लिखाण अप्रकाशित असल्याबाबत**

**(८) १९५६१ (२३-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सन १९३० ते १९५५ या काळात प्रकाशित झालेल्या "जनता" साप्ताहिकामधील लेखन प्रकाशित करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर "जनता" या साप्ताहिकातील लिखाण प्रकाशित न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, "जनता" या साप्ताहिकातील लिखाण प्रकाशित व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) होय.

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीकडे मूळ दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे प्रकाशित करता आले नाही.

(३) "जनता" साप्ताहिकामधील प्रकाशित झालेले लिखाणाचे दस्तऐवज मिळविण्याबाबत समितीने केलेल्या प्रयत्नास यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे "जनता" साप्ताहिकाचे लवकरच प्रकाशन करण्यात येईल.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थविषयक ग्रंथाचा मराठी अनुवाद शासन दरबारी धूळखात पडून असल्याबाबत**

**(९) १९६२४ (२३-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर योची १२५ वी जयंती राज्यासह देशभरात साजरी होत असताना त्यांच्या अर्थविषयक "प्राम्ब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन ॲड इट्स सोल्युशन" या इंग्रजी ग्रंथाचा "रुपयाचा प्रश्न उद्‌गम आणि उपाय" हा मराठी अनुवाद मात्र गेल्या २० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इंग्रजी ग्रंथ मराठी भाषकांपर्यत पोहोचावा म्हणून या ग्रंथाच्या मराठी अनुवादाचे काम राज्य शासनाने वर्धा येथील ग्रामीण सेवा महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ.विजय कवीमंडन यांच्याकडे सन १९९४ मध्ये सोपविल्यानंतर त्याची सुमारे ७०० पानाचा अनुवाद करून २ वर्षात शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुवादाच्या दर्जाबाबत तंज्ज्ञाचा समाधानकारक अहवाल दिनांक १ सप्टेंबर, १९९६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्रा साधने प्रकाशन समितीला सादर करण्यात आला असून सदरहू समितीने तो प्रकाशनासाठी स्वीकारून दिनांक २५ मार्च, १९९७ रोजी डॉ.कवीमंडन यांना मानधन ही मंजूर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू समितीच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या बैठकीत या अनुदानाच्या अंतिम छपाईला मान्यताही देण्यात आलेली असतानाही अद्यापी हा अनुवाद मराठी ग्रंथ वाचकांसमोर आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या सदरहू अर्थविषयक ग्रंथाचा मराठी अनुवाद लवकरात लवकर उपलब्ध होणाच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) मूळच्या इंग्रजी ग्रंथाचा दर्जेदार मराठी अनुवाद करून घेण्यासाठी पुन्हा जाहिरात देऊन, तज्ञ अनुवादकाची निवड करण्याबाबत सदस्य-सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती यांना सूचना देऊन, लवकरात लवकर काम पूर्ण करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

(६) डॉ.विजय कविमंडन यांनी केलेला अनुवाद डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने अमान्य केला आहे.

---

## राज्यातील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळणे व अन्य प्रलंबित मागण्यांबाबत

**(१०) १९८४१ (२३-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** तारांकित प्रश्न क्रमांक १६२७८ ला दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे तुकड्या, वर्ग, संचमान्यता, वैयक्तिक मान्यता, मुल्यांकन, तपासणी, पात्रता यादी जाहिर करणे व वेतन देयके अदा करणे या मागण्यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना शिक्षण संचालक, पुणे यांच्यास्तरावरुन सुचना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाबतीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे आणि संबंधित किती विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालये, तुकड्या, वर्गांना अनुदान मंजुर करण्यात आले आहे,

(३) शिक्षण उपसंचालक यांचेस्तरावरून अद्‌याप सदरहु कार्यवाही करण्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदरील कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना जुन्या नियमानुसार सहा आठवडयात वेतनवाढ देण्याबाबत**

**(११) २०११५ (२३-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक १६०६८ ला दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सन २०१४ पूर्वी जुन्या नियमानुसार सहा आठवडयात वेतनवाढ देण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाला दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदर शिक्षकांना त्वरीत वेतनवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचा आदेश माहे मार्च, २०१६ मधील नसून दिनांक १६/१२/२०१४ चा आहे. सदर आदेश ३८ याचिकाकर्त्या शिक्षकांचे संदर्भात आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्या ३८ शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीच्या अनुषंगाने आर्थिक लाभ मंजूर करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शालेय पोषण आहार योजनेतील केंद्रीय स्वयंपाकगृहाला महिला बचत गट व अन्य संस्थेचा विरोध असल्याबाबत**

**(१२) २०८८६ (२३-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आगामी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून शालेय विद्‌यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत पोषण आहाराचा पुरवठा केला जाणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत राज्य शासनाने निर्णय घेतल्यास गेल्या दहा बारा वर्षापासून आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गट व अन्य संस्थांमधील सुमारे दीड लाख कामगार बेकार होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेतील केंद्रीय स्वयंपाकगृहाला महिला बचत गट व अन्य संस्थेचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील बचत गटातील बेकार होणाऱ्या होणाऱ्या महिलांचा प्रश्न सोडविण्याबाबत राज्यशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :** (१) शालेय पोषण योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १८/०६/२००९ रोजी घेतलेला आहे. यानुसार मुंबई महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर नागरी भागांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. तथापि याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अद्याप सुरू करता आलेली नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१५ मध्ये राज्य शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.
(२) नाही. सद्यस्थितीत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे.
(३) व (४) केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अवलंब करून आहार द्यावयाचा झाल्यास यामुळे गरजू महिलांचा रोजगार जाणार नाही, या दृष्टिने महिलांना केंद्रीय स्वयंपाकगृहामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील सिंचन विहीरींची योजना रखडल्याबाबत**

**(१३) २१२९७ (१८-०८-२०१६). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सिंचन विहीरीसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊनही सिंचन विहीरीची योजना बारगळली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सिंचन विहीरीची योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातील गळतीचे प्रमाण रोखण्याबाबत**

**(१४) २२०६७ (१९-०८-२०१६). आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शासन प्रयत्नशील असताना पहिलीत प्रवेश घेतलेल्या १०० आदिवासी विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी महाविद्यालयापर्यंत पोहोचत नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. इयत्ता १० वी व १२ वी नंतर सर्वच विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत नाही. काही विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र, डी.एड., आय.आय.टी सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संलग्न वसतिगृहात वा वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीअंतर्गत देय निर्वाह भत्याव्यतिरिक्त निर्वाह भत्ता देण्यात येतो. तसेच खाजगी विना-अनुदानित कायम विना-अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते. तसेच परदेशी उच्च शिक्षणासाठी प्रवेशित १० विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

तथापि, अजुनही शिक्षणाचा पुरेसा प्रसार नसल्याने इयत्ता १० वी / १२ वी नंतर मुलींचे विवाह केले जातात. बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे काही मुले आईवडिलांना मदत करुन अर्थार्जनाला लागतात. त्यामुळे काही प्रमाणात महाविद्यालयीन शिक्षणात आदिवासी विद्यार्थ्यांची गळती दिसून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे टाकरखेडा संभू (जि.अमरावती) येथील वायगाव फाटा ते वायगाव मार्गावरील झुकलेले विद्युत खांब बदलण्याबाबत**

**(१५) २२८०२ (१९-०८-२०१६). *श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त* :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टाकरखेडा संभू (जि.अमरावती) येथील वायगाव फाटा ते वायगाव या ३ कि.मी.च्या मार्गावरील विद्युत खांब अनेक वर्षापासून झुकलेले असून याप्रकरणी वीज वितरण कंपनी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री क्षेत्र वायगाव हे गणपतीचे मंदिर असून दर महिन्यांच्या चतुर्थीच्या दिवशी हजारो भाविकांची पायदळ वारी या मार्गावरून जात येत असल्याने या जिवंत तारा रस्त्यालगत गेल्याने प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला असल्याने येथील नागरीकांनी शासनाकडे तक्रार केली असूनही वीज वितरण कंपनीने अद्यापपर्यंत दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर ठिकाणचे विद्युतचे झुकलेले खांब बदलण्याबाबत तसेच, याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या वीज वितरण कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) मौजे टाकरखेडा संभू (जि.अमरावती) येथील वायगाव फाटा ते वायगाव या ३ किमीच्या मार्गावरील विद्युत खांब झुकलेले असल्याबाबतचे वृत्त दै.सकाळ अमरावती या वृत्तपत्रामध्ये दिनांक २६/३/२०१६ रोजी प्रकाशित झाले होते.

(२) (३) व (४) हे खरे नाही.

सदर वाहिनीचे झुकलेले ५ खांब संबंधित वीज वितरण केंद्राकडून दिनांक ०४/०४/२०१६ रोजी सरळ करण्यात आले असून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

---

**वेल्हा व मुळशी (जि.पुणे) या दोन तालुक्यात न्यायालय स्थापन करण्यास जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) २३३७१ (२४-०८-२०१६). आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हा व मुळशी (जि.पुणे) या दोन तालुक्यात अद्याप न्यायालये नाहीत तसेच मा.उच्च न्यायालय येथे न्यायालय स्थापन करण्यास अनुकूल असतानाही शासन जागा उपलब्ध करुन देत नसल्याने न्यायालय स्थापन करण्याचा विषय प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत न्यायालयासाठी जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही. मौजे माले तालुका मुळशी येथे शासन अधिसूचना क्रमांक ग्रामन्या ३५१५/प्र.क्र.५७/कार्यासन १२, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ प्रमाणे ग्राम न्यायालय स्थापन झालेले आहे.

वेल्हा येथे ग्राम न्यायालय/दिवाणी न्यायालय कनिष्ठस्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य विभागात औषध खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) २३५७२ (११-११-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागात खरेदी करण्यात आलेल्या २९७ कोटी रुपयांच्या औषधांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या अतिरिक्त मुख्य सचिव भगवान सहाय यांच्या समितीने औषध खरेदीत गैरव्यवहार झाला नसल्याचा अहवाल दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्यानंतर श्री. गौतम चटर्जी, माजी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अधिक चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने माहे ऑगस्ट, २०१६ च्या तिस-या आठवडयात सादर केलेल्या अहवालात औषध खरेदीत गैरव्यवहार झालेला नाही असे नमूद केले असून सदर अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त २९७ कोटी रुपयांची औषध खरेदी अपारदर्शी आणि गैरप्रकारे केली गेली असल्याचे तसेच औषध वाटपात गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे मत दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्यावेळी नोंदविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आरोग्य सेवा संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या औषध खरेदीची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या डॉ.भगवान सहाय, अपर मुख्य सचिव यांच्या एकसदस्यीय समितीने सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालामध्ये पुर्णवेळ चौकशी अधिकारी नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत शिफारस करण्यात आली होती.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या श्री.गौतम चॅटर्जी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांच्या एकसदस्यीय समितीने सादर केलेला चौकशी अहवाल शासनाने स्वीकारला आहे.

सदर अहवालामध्ये, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या खरेदीमध्ये खरेदी आणि पुरवठा करताना कोणतीही अनियमितता किंवा प्रचलित पध्दतीचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले नाही तसेच राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेल्या खरेदीत आर्थिक गैरव्यवहार नसला तरी निष्काळजीपणा व समन्वयाचा अभाव दिसून आला आहे, असे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितावर विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्रमांक १३४/२०१६ दाखल करण्यात आलेली असून सदरहू प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी प्रशासकीय कामकाजाकरिता**
**मुंबई शहरात स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत**

**(१८) २३६५९ (०४-०१-२०१७). ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९७९ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता मुंबई शहरात स्वतंत्र इमारत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयासाठी सद्यःस्थितीत मुंबई येथे स्वतंत्र इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित केल्यानुसार जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय, असल्यास, केव्हा व कोठे,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी मुंबई विद्यापीठ, कलिना, सांताक्रुझ परिसर येथे अथवा वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स परिसरात इमारत बांधण्याबाबत अथवा शासकीय जागा हे पर्याय लक्षात घेता स्वतंत्र इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयासाठी मुंबई येथे तयार इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय क्र. मलोआ-१११६/प्र.क्र.८७/आठ, दिनांक ७ जुलै, २०१६ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्धतेबाबत विविध पर्यायांची तपासणी करण्यासाठी प्रधान सचिव (सेवा) यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. विविध पर्याय विचारात घेवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगास आवश्यक असलेली १,००,००० चौ.फुट इतकी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत समितीकडून कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात ठाणे, पालघर, शहापूर येथे एकात्मिक बालविकास प्रकल्प**
**अधिकारी यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१९) २३६८४ (११-११-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे, पालघर, शहापूर येथे एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने सदर पदे भरण्याचे निदेश सचिवांनी दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी देवूनही सदर पदे माहे सप्टेंबर, २०१६ अखेर भरण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाडा तालुक्यात (जि.पालघर) माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत झालेल्या बालमृत्यूची नोंद होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, तालुकयातील वाडा १ व वाडा २ या प्रकल्प कार्यालयात गेल्या दीड वर्षापासून प्रकल्प अधिकाऱ्यांचे पद रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शसनाने चौकशी करुन एकात्मिक बालविकास प्रकल्प अधकाऱ्यांची पदे न भरण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) होय.

बाल विकास प्रकल्प अधिकारी गट-ब ची रिक्त पदे पर्यायी व्यवस्थेने तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग व मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या संयुक्त स्वाक्षरीने दिनांक ९/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. तथापि, यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी स्थगिती दिली आहे.

(२) नाही.

(३) होय.

वाडा १ व वाडा २ या प्रकल्पातील बाल विकास प्रकल्प अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार त्याच प्रकल्पातील ज्येष्ठ व पदवीधर मुख्यसेविका यांना देण्यात आला आहे.

(४) रिक्त पदांपैकी सरळसेवा व पदोन्नतीच्या कोट्यातील पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे. सरळसेवेच्या कोट्यातील १४७ उमेदवारांच्या शिफारशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झाल्या आहेत. सदर उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सरळसेवेच्या कोट्यापैकी ४५ पदांसाठी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे विलंबाबाबत कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**महालखेडा (ता.येवला, जि.नाशिक) येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम सुरु करण्याबाबत**

**(२०) २३७३९ (१६-१२-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालखेडा (ता.येवला, जि.नाशिक) येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे सन २०१२ मध्ये सुरु झालेले काम अंदाजपत्रकीय संकल्पापेक्षा जास्त असल्याने माहे जून, २०१५ पासून बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :** (१) होय

(२) पाया खोदाई संधानकाचे परिमाणात वाढ झाल्याने सुधारित मान्यतेची कार्यवाही क्षेत्रिय विभागामध्ये प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील २६ सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२१) २३९९९ (१८-११-२०१६). श्री.नारायण राणे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन शासनाच्या कालावधीत 'एआयबीपी' योजनेंतर्गत सिंचन प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी देण्यात येत होता मात्र केंद्रात २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकीत सत्तांतर झाल्यानंतर सदरहू योजनेचे नाव बदलून 'पंतप्रधान कृषि सिंचाई योजना' असे नामांतर करण्यात आले व या योजनेंतर्गत राज्याचा केंद्राच्या वाटयाला असलेला निधी तातडीने वितरीत करण्याची घोषणा मा.पंतप्रधान यांनी केल्यानुसार राज्यातील प्रामुख्याने दुष्काळी जिल्हे, शेतकरी आत्महत्याग्रस्त विभागातील २६ अपूर्णावस्थेतील प्रकल्पाचा समावेश करून त्यासाठी केंद्राच्या वाटयाच्या ३६ हजार कोटी रुपयांचे मागणी करणारा प्रस्ताव पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी भागातील २६ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने ३६ हजार कोटींची मागणी केली असता केंद्राने माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवडयात निर्णय घेवून केवळ ३ हजार ६०० कोटी देण्याचे कबूल केले असून 'नाबार्ड' च्या माध्यमातून १२ हजार ५०० कोटीचे कर्ज देण्यात येणार आहे, यामुळे केंद्र शासनाने राज्याच्या मागणीला केंद्र शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील ८० ते ९० टक्के कामे पूर्ण झालेले आणखी २८ प्रकल्पही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकल्पाची कामे शीघ्र गतीने हाती घेवून पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने एआयबीपी (वेगवर्धित सिंचन लाभ योजना) तील प्रगतीपथावरील राज्यातील २६ मोठ्या व मध्यम प्रकल्पांचा अंतर्भाव ''पंतप्रधान कृषि सिंचाई योजनेत'' करणेत आला आहे. या प्रकल्पांची उर्वरित किंमत रुपये १६६०३ कोटी एवढी आहे. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ३८३० कोटी इतके केंद्रीय अर्थसहाय्य मिळणार आहे. तसेच सदर २६ प्रकल्प पुर्ण करणेसाठी राज्यास निधी उपलब्ध करता यावा यासाठी केंद्र शासनाने नाबार्ड चे माध्यमातून दिर्घ मुदतीचे व कमी व्याजदराने रुपये १२,७७३ कोटी इतके कर्ज उपलब्ध करुन देणेचा निर्णय घेतला आहे. कर्ज उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही प्रगतीवर आहे. त्यानुसार सन २०१६-१७ मध्ये रुपये २१३२.६२ कोटी इतके केंद्रीय अर्थसहाय्य मिळणेबाबतचा प्रस्ताव केंद्रास पाठविण्यात आला आहे. तसेच नाबार्ड कर्ज उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) केंद्र शासनाने राज्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केलेले नाही.
(३) सन २०१६-१७ मध्ये पूर्णत्वाजवळ असलेले व या वर्षात पूर्ण होऊ शकतील असे २८ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी पुरेशा निधीची तरतूद सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करणेत आली आहे.
(४) अंतिम टप्यातील प्रकल्प पूर्ण करणेसाठी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. केंद्रीय अर्थसहाय्यासाठीचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविले आहेत. नाबार्ड कर्ज उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळाडूंना शासनाकडून देण्यात येणाऱ्या पेन्शनसाठी उत्पन्नाची अट रद्द करण्याबाबत**

**(२२) २४०३४ (१६-१२-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळाडूंना शासनाकडून देण्यात येणाऱ्या निवृत्ती वेतनासाठी उत्पन्नाची अट लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी अशी मागणी अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्यावतीने शासनाकडे वेळोवेळी करण्यात आलेली असून कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०१-२०१६) :** (१), (२) व (३) ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळाडूंना राज्य शासनाकडुन निवृत्ती वेतन अदा करण्यात येत नाही. तथापि महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू तसेच किताब प्राप्त कुस्तीगिरांना दिनांक २१/१२/२०१२ च्या शासन निर्णयानुसार सुधारित दराने मानधन अदा करण्यात येते. तसेच दिनांक ०७/०५/२००७ च्या शासन निर्णयानुसार वयोवृध्द खेळाडुंना मानधन मिळण्यासाठी असणारी उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रुपये ४०,०००/- वरुन वाढवून रुपये १,००,०००/- पर्यंत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सुरु करण्यात आलेल्या मनोधैर्य योजना, सुकन्या योजना व कन्या भाग्यश्री योजनांना निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२३) २४२४६ (१८-११-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक २२०२४ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये बलात्कार किंवा ॲसिड हल्ल्यातील पिडीतांसाठी मनोधैर्य योजना, दारिद्र्यरेषेखालील मुलींसाठी सुकन्या योजना तसेच स्त्रीभृण हत्या रोखण्यासाठी कन्या भाग्यश्री योजना या योजनांसाठी महिला व बाल विकास विभागाने पुरेसा निधी उपलब्ध करून दिला नसल्याने मुलींना व महिलांना अर्थसहाय्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच (मनोधैर्य) योजनेंतर्गत ९९१ पिडीतांचा पाठपुरावा शासन दप्तरी करण्यात न आल्याने यापैकी ३२८ पिडीत महिला घर सोडून बेपत्ता झाल्या आहेत त्यामुळे या योजनेचा मूळ उद्देश अयशस्वी ठरल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मनोधैर्य योजनेच्या निकषानुसार पिडीतास प्रत्येकी रुपये अडीच लाख तर सदर योजनेकरिता १२० कोटी रुपयांची तरतूद करणे अपेक्षित असताना निधी अभावी पिडीतांना अर्थसहाय्य मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच महिला व मुलींच्या योजनांच्या कार्यवाहीकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याबाबत लेखी निवेदन समर्थन संस्थेने मा. मंत्री (महिला व बाल विकास) यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच पिडीत महिला, बालकांचे मनोबल वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या मनोधैर्य ट्रामा टिम समितीची अद्याप राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात स्थापना करण्यात आली नसल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरची योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत ६१९९ प्रकरणे शासनाकडे प्राप्त झाली असून त्यापैकी शासनाने ४७०७ प्रकरणांस मंजुरी दिल्याचे व त्यापैकी प्रत्यक्षात २७८७ प्रकरणार्थींना अर्थसहाय्य देण्यात आले असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,

(६) तसेच शासनाने मंजुर केलेल्या प्रकरणांपैकी अद्याप १९२ प्रकरणातील लाभार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यात आलेले नाही तसेच शासनाकडे प्राप्त झालेल्या उर्वरित १४९२ प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बलात्कार पिडीतांना समुपदेशन, आर्थिक आधार, कायदेशीर मदत आणि साक्षीदारांना संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१६) :** (१) नाही.

मनोधैर्य योजनेकरिता सप्टेंबर, २०१६ अखेर एकूण सर्व प्रलंबित प्रकरणांसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात उपलब्ध मूळ तरतुदीच्या व्यतिरिक्त रुपये २७,६६,३३,०००/- इतकी तरतूद आकस्मिकता निधी अग्रिमाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच माझी कन्या भाग्यश्री या नवीन योजनेमध्ये सुकन्या ही योजना विलीन करुन त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. सन २०१६-१७ या चालू आर्थिक वर्षी या योजनेसाठी रु.२५.०० कोटी एवढा निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

(२) नाही

(३) नाही.

(४) नाही.

(५) नाही.

(६) प्रलंबित प्रकरणांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये जलसंधारणाचा "जलयुक्त शिवार" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविताना अनेक ठिकाणी अनियमितता झाल्याबाबत**

**(२४) २४२५१ (११-११-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये जलसंधारणाचा "जलयुक्त शिवार" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविताना अनेक ठिकाणी अनियमितता झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील अनेक कामे अपूर्ण आहेत, तसेच मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान खर्च करण्यात आलेल्या निधीचा दुरुपयोग झाल्याचा लेखी तक्रारी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर उपविभाग व कुर्डुवाडी उपविभागात (जि.सोलापूर) येथे एकाच कामासाठी एकाच ठेकेदाराकडून वेगवेगळे दर आकारणी झाल्याचे व अमळनेर जि. जळगांव येथेही अनेक कामे निकृष्ट झाल्याची लेखी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, श्री.शिरीषदादा चौधरी, मा.वि.स.स. अमळनेर यांनी दिनांक ०३/०६/२०१६ रोजी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत अंमळनेर विधानसभा क्षेत्रात करण्यात येत असणारी सिमेंट नाला बांधाची कामे निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार केली आहे.

(४) श्री.शिरीषदादा चौकशी, मा.वि.स.स. यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित सिमेंट नाला बांधाच्या कामांचे मुल्यमापन त्रयस्थ संस्था, जलश्री, पाणलोट सर्वेक्षण व संशोधन संस्था यांचेमार्फत करण्यात आले आहे. संस्थेच्या मूल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने संबंधित बांधकाम करणाऱ्या ठेकेदारांची नावे काळ्या यादीत टाकण्यात आली असून त्यांना जळगाव तसेच संपुर्ण राज्यात जलयुक्त शिवार अभियानची कामे करण्यापासून प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई करणेबाबतच्या सुचना दिल्या आहेत.

---

**नंदुरबार तालुक्यातील तापी बुराई उपसा सिंचन योजना सुरु करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(२५) २४६६८ (११-११-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुक्यातील तापी बुराई उपसा सिंचन योजनेचे काम निधी अभावी गेल्या २ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी तालुक्यातील उक्त योजना त्वरीत सुरू व्हावी यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत उक्त योजनेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-११-२०१६) :** (१) नाही.

(२) आदिवासी उपयोजनेंतर्गत तसेच महामंडळाच्या अर्थसंकल्पाद्वारे आवश्यक निधी उपलब्ध होत आहे. प्रकल्पासाठी रुपये २३.१२ कोटी इतका निधी उपलब्ध आहे.

(३) व (४) प्रकल्पासाठी लागणाऱ्या ४.३३ हेक्टर वनजमिनीचे तसेच ३८.३३ हेक्टर खाजगी जमिनीचे भूसंपादन आवश्यक आहे. याबाबतची पुर्तता करुन ५ वर्षात प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंश झालेल्या व्यक्तिचा हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत**

**(२६) २४६८६ (११-११-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात सर्पदंश झालेल्या व्यक्तिवर तात्काळ योग्य उपचार न करता दंश करणारा साप विषारी की बिन विषारी याची शहानिशा करण्यासाठी रुग्णालयातल्या कर्मचाऱ्याने त्या रुग्णास कडूलिंबाची पाने खाण्यास दिली व मंत्रोपचार सुरु केले, ही प्रक्रिया करण्यात बराच वेळ गेल्याने अखेर रुग्णाचा मृत्यू झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या मृत्यूला जबाबदार रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकाऱ्यासह संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१६) :** (१) होय.

(२) त्रिसदस्यीय समितीद्वारे सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथून ग्रामीण रुग्णालय, भद्रावती येथे तात्पुरत्या स्वरुपात संलग्न करण्यात आली आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्याची सेवा उपजिल्हा रुग्णालय, चिमूर येथे संलग्न करण्यात येऊन जिल्ह्याबाहेर बदली प्रस्तावित आहे. तसेच त्याची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यात महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या विविध कामांत अनियमितता झाल्याबाबत**

**(२७) २४७१७ (२८-११-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ मध्ये जालना जिल्ह्यात महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या विविध कामांत अनियमितता होऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील विविध तालुक्यांत कार्यरत असलेल्या पाच बीडीओंचा समावेश असून त्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-११-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील परतूर, मंठा, भोकरदन, घनसावंगी व जालना या तालुक्यांमध्ये सन २०१३-१४ व त्यानंतरच्या कालावधीमध्ये सुरु असलेल्या कामासंदर्भात ग्रामस्थांकडून व लोकप्रतिनिधींकडून तत्कालीन संबंधित पाच गट विकास अधिकारी यांचेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी केल्यावर सदर पाच गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या कामात व कर्तव्यात हलगर्जीपणा, टाळाटाळ व कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून आल्याने त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यास्तरावर सुरु आहे. सदर चौकशी तात्काळ पूर्ण करणेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना शासनस्तरावरुन सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैद्यकीय क्षेत्रात सुरु झालेल्या कट प्रॅक्टिसमुळे गरीब व मध्यमवर्गातील रुग्णांच्या नातेवाईकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२८) २४७६८ (११-११-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील काही वर्षात नागरीकांच्या जीवनशैलीत मोठ्या प्रमाणात बदल झाला असल्यामुळे कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग, ओबेसीटी अशा मोठया आजारांची संख्याही वाढही असल्याचे आढळून आले असून वैद्यकीय क्षेत्रात सुरु झालेल्या कट प्रॅक्टिसमुळे गरीब व मध्यमवर्गातील रुग्णांच्या नातेवाईकांचे नुकसान होत असल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठया रुग्णालयामध्ये प्रॅक्टिस करत असलेल्या वैद्यकीय तज्ञांना रुग्णालयाने काही ठरावीक लक्ष्य दिलेले असून यामध्ये महिनाभरात सोनोग्राफी, एमआरआय आणि पॅथोलॉजी लॅबमधील चाचण्यांचा समावेश असल्याने हे वैद्यकीय तज्ज्ञ गरज नसतानाही रुग्णांना दिलेले टार्गेट पूर्ण करण्याकरीता चाचण्या करण्यास सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉक्टरांनी टार्गेट पूर्ण न केल्यास रुग्णालयाच्या पॅनलवरुन काढण्याची धमकी दिल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कट प्रॅक्टिसच्या टार्गेटवर निर्बंध आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-११-२०१६) :** (१) जीवनशैली बदलल्यामुळे आजार वाढले आहेत, ही बाब खरी आहे. परंतु कट प्रॅक्टिस राजरोसपणे सुरु आहे, ही बाब निदर्शनास आल्याचे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यात विविध पर्यटन स्थळी**
**झालेल्या दुर्घटनेत मृत्यु झाल्याबाबत**

**(२९) २४९२६ (११-११-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात पावसाळ्यात गेल्या दोन महिन्यांत विविध पर्यटन स्थळी झालेल्या दुर्घटनांत तब्बल २० जणांचा बुडून मृत्यू झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पर्यटनस्थळी होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता पावसाळयात जीवरक्षक नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-११-२०१६) :** (१) व (२) वसई तालुक्यातील विविध नऊ पर्यटन स्थळी जून, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत एकूण १६ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. वसई तालुक्यातील सुरुची बाग (भास्कर आळी) व राजोडी बिच या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. तसेच महत्वाच्या समुद्र किनारी पोलीस ठाण्याचा दूरध्वनी क्रमांक, रुग्णवाहिका, सरकारी दवाखाने याबाबत सूचना फलक, टेहळणी मनोरे, सायरन, सर्च लाईट, इत्यादी व्यवस्था करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विविध विभागांनी अर्थसंकल्पातील तरतूदीपेक्षा अतिरिक्त खर्च केल्याबाबत**

**(३०) २४९५२ (११-११-२०१६). श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २०२५९ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध विभागांनी अर्थसंकल्पातील तरतूदीपेक्षा अतिरिक्त खर्च केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या विभागांनी किती रक्कमेचा अतिरिक्त खर्च केला आहे,

(३) तसेच अतिरिक्त खर्चाचे समायोजन करण्यासाठी भविष्यात अतिरिक्त खर्च होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१४-१५ वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालानुसार महसूल व वन विभाग रुपये ३.१७ कोटी, नियोजन विभाग (जिल्हा योजना) रुपये १४०.७२ कोटी, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग रुपये ३४४.२८ कोटी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय रुपये ०.०३ कोटी, वित्त विभाग रुपये ३३२२.८६ कोटी, जलसंपदा विभाग रुपये ६.६६ कोटी, असे एकुण रुपये ३८१७.७२ कोटी इतक्या रक्कमेचा अतिरिक्त खर्च केला आहे.

(३) वित्त विभागामार्फत वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन प्रशासकीय विभागांना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. आगामी वर्षाच्या अर्थसंकल्प तयार करताना चालू वर्षाचे सुधारीत अंदाज आठमाही खर्चाचा कल पाहून विभागास उपलब्ध करुन देण्यात येतात. विभागांद्वारे सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत खर्च करणे अपेक्षित असताना अधिकचा खर्च झाल्याचे दिसून येते. प्रशासकीय विभागांच्या अखत्यारितील नियंत्रक/आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत खर्च करावा यासाठी स्वतंत्र आदेश पुन्हा निर्गमित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे काम करणाऱ्या हंगामी कामगारांना सेवेत नियमित सामावुन घेण्याबाबत**

**(३१) २५१८७ (११-११-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे ३२ वर्षापासुन काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने सेवेत नियमित करण्यासाठी मा.न्यायालयाने निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी २४० दिवसाची सेवा अट रद्द करण्यासाठी शासनाचा विचार झाला आहे काय,

(३) असल्यास, वन विभाग व औद्योगिक महामंडळाने त्यांच्या कंत्राटी/हंगामी कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी २४० दिवसाची अट रद्द केली त्यानुसार वैद्यकिय शिक्षण विभाग करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हंगामी कामगारांना न्याय देण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हापरिषदेच्या महिला बाल कल्याण विभागातील बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरणेबाबत

**(३२) २५१९४ (११-११-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागात १६ पैकी १४ बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १४ तालुक्यासाठी कायमस्वरुपी बालविकास प्रकल्प अधिकारी नसल्याने शासनाच्या योजना राबविण्यासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील ३००० अंगणवाड्याचा कारभार व्यवस्थित चालवण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार त्या तालुक्यांच्या सहायक गट विकास अधिकारी, नजीकच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी व वरिष्ठ पर्यवेक्षिका यांच्याकडे सोपविण्याबाबत शासन निर्णय दिनांक २८/५/२०१५ अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय दिनांक २८/७/२०१६ अन्वये पाच वर्ष सेवा झालेल्या पर्यवेक्षिकांना बाल विकास प्रकल्प अधिकारी रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देवून त्यांना आहरण व संवितरण अधिकारी कामही सोपविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या व सरळसेवेच्या कोट्यातील पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांपैकी १४७ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झाल्या आहेत. सदर शिफारस प्राप्त उमेदवारांच्या नियुक्त्या लवकरात लवकर करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अन्न सुरक्षा योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य देण्याबाबत

**(३३) २५२२० (१६-१२-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न सुरक्षा योजनेचा फायदा दारिद्रय रेषेखालील शिधावाटप कार्डधारकांना स्वस्त धान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा फायदा राज्यातील किती दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना होणार आहे व कोणत्या महिन्यापासून लागू करण्यात येणार वा देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पुर्वी ज्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळत होता. परंतु, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादेमुळे जे लाभार्थी सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्यापासून वंचित राहिले आहेत, अशा लाभार्थ्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये राज्यातील सर्व जिल्ह्यांना सुधारित इष्टांक दिला आहे.

(२) राज्यातील वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांपैकी दिनांक ३०/०९/२०१६ पर्यंतच्या सुमारे १.५० कोटी (एपीएल) केशरी लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) २५२२२ (११-११-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हातील ५८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३३९ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील व ३ उपजिल्हा रुग्णालयातील तसेच १० ग्रामीण रूग्णालय व जिल्हा सामान्य रुग्णालयातील वर्ग १, २ व ३ ची ९२० पदे मंजूर असून केवळ ५१३ पदे भरली असून ३०७ पदे गेल्या १ वर्षापासून रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

चंद्रपूर जिल्हा अंतर्गत गट-अ ते गट-क ची एकूण १७९९ पदे मंजूर असून त्यापैकी १३३५ पदे भरण्यात आलेली असून ४६४ पदे रिक्त आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे. रुपये ६६००) संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरुन करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच गट-क ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बालगृहांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(३५) २५३११ (१६-११-२०१६). श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महिला व बालविकास विभागाची नियंत्रणाखाली राज्यात सुमारे एक हजार बालगृहे आहेत त्यामध्ये तब्बल ८० हजार मुले-मुली आहेत, शासनाकडून प्रत्येक मुलामागे दरमहा १ हजार २५० अनुदान देत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही बालगृह चालकांकडून मुलांना पुरेशा सोई-सुविधा पुरविल्या जात नाहीत केवळ शासकीय अनुदान लाटण्यासाठी त्या बालगृहाचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी येत होत्या, त्यामुळे सदर बालगृहाची अचानक तपासणी करुन त्यांची वर्गवारी करण्याच्या निर्णय राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान घेतला असून बालगृहाची तपासणी करण्यासाठी त्या तया जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समित्या स्थापन करण्याच्य सूचना दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ जुले, २०१५ च्या शासन निर्णयानुसार उक्त बालगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणाची शासनाने चाकशी केली आहे काय, त्यात चौकशीनुसार राज्यात कोण कोणतया जिल्ह्यात किती बोगस बालगृहे आढळून आलेली आहेत, त्यानुसार सदर संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ अन्वये राज्यातील सर्वसाधारण बालगृहात रुपये १२१५/- तर विशेष बालगृहांना रुपये १३०५/- एवढे सहाय्यक अनुदान दरमहा दरडोई दिले जाते.

राज्यातील मान्यताप्राप्त बालगृहांची संख्या ११०५ असून यामध्ये स्वयंसेवी संस्थांची बालगृहे ९९४ इतकी आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील बालगृहांमध्ये १३,३५० एवढे लाभार्थी प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

(२) व (३) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन शासन निर्णय दिनांक १३/०७/२०१५ अन्वये राज्यातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणार बालगृहे शासनाने विहीत केलेल्या निकषानुसार सुरु आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्याकरिता जिल्हाबाह्य उप जिल्हाधिकारी/उप मुख्य अधिकारी/ तहसिलदार/ सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी यांचे पथक गठित करुन बालगृहांची तपासणी करण्यात आलेली आहे.

(४) राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालगृहांची तपासणी करण्यात आलेली आहे. मात्र, दरम्यानच्या काळात काही संस्थांचालकांनी शासनाच्या तपासणी विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केल्या असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोगदा (ता.जव्हार, जि.पालघर) गावातील रोजगार हमीवरील मजुरांना मजुरी मिळण्याबाबत**

**(३६) २५३५१ (११-११-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोगदा (ता.जव्हार, जि.पालघर) गावातील रोजगार हमी योजनेतील १०३ मजुरांनी एप्रिल व मे महिन्यात बंधारे व तलावातील गाळ काढण्याचे काम करुनही सप्टेंबर, २०१६ उलटूनही अद्यापी त्यांना मजुरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रोहयो मजूरांना मजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील मेडीकल मध्ये १२ वसतिगृहांची दूरवस्था झाल्याबाबत**

**(३७) २५५४० (२२-११-२०१६). श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेडीकल मध्ये १२ वसतिगृह असून विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांची दूरवस्था झालेली असून मेडीकलमध्ये होणारा पाणीपुरवठा देखील दूषित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१२-२०१६) :** (१) व (२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे एकूण ११ वसतिगृहे आहेत. सदरच्या बांधकामात सुमारे ७० वर्षे झाली असल्याने वसतिगृहांमधील बाथरुम, दारे-खिडक्या, पायऱ्या नादुरुस्त झाल्याचे दिसून आले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वसतिगृहाच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

संस्थेमधील पाण्याच्या टाक्या स्वच्छ करुन घेण्यात आल्या असून त्या योग्य प्रकारे झाकून ठेवण्यात आल्या आहेत. सदर संस्थेस सुरळीत पाणी पुरवठा सुरु असून तो दूषित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कामांच्या तुलनेत अत्यस्थ निधी वितरीत झाल्याने राज्यातील रस्त्यांची कामे रखडल्याबाबत**

**(३८) २५५४४ (११-११-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १४८१९ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कामांच्या तुलनेत अत्यल्प निधी वितरीत झाल्याने राज्यातील रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या योजनेंतर्गत मंजूर कामांना निधी मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात आतापर्यंत रुपये ४३७.१० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय विभागात विविध पदे रिक्त असल्याबाबत**

**(३९) २५५५३ (११-११-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय अधिक्षकांची १५ पदे, वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३० पदे यासह अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १४ दुष्काळी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील रिक्त पदे भरतांना सोलापूर जिल्ह्यातील पदे देखील भरली जातील असे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिले होते, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन सदर आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी येथील वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षकांची १५ पदे व वैद्यकीय अधिकाऱ्यांची २६ पदे रिक्त आहेत. तथापि रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) होय, खरे आहे.

(३) दिनांक १६/११/२०१६ च्या पत्रान्वये सोलापूर जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ (वर्ग-२) अधिकाऱ्यांची २४ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिक्षकांची रिक्त पदे पदोन्नतीने तसेच नामनिर्देशनाने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) पदे भरण्याची कार्यवाही सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत**

**(४०) २५५९९ (०४-०१-२०१७). श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २२६४५ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गत ४० वर्षापासून केवळ चाळीस रुपये विद्यावेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अत्यल्प असल्याने विद्यार्थ्यांकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यावेतनात वाढ करण्याच्या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, व सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०२-२०१७) :** (१) होय.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील एकूण प्रशिक्षणर्थींपैकी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या प्रशिक्षणार्थींना रुपये ४०/- दरमहा तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थींना रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

(२) होय.

(३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यामध्ये अद्याप निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ अशासकीय आयटीआय संस्थांना व एमसीव्हीसी महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत**

**(४१) २५७६७ (०४-०१-२०१७). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २२६५० ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना तसेच अशासकीय एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावित बाबीवर शासनाकडून अंतिम निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित अशासकीय आयटीआय संस्था व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०२-२०१७) :** (१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना तसेच अशासकीय एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला, बुलढाणा, वाशिम जिल्हा परिषदेमधील वर्ग- १ व वर्ग-२ ची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४२) २५७९८ (१६-११-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, बुलढाणा, वाशिम जिल्हा परिषदेमधील वर्ग-१ व वर्ग-२ ची मंजूर पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर पदापैकी अकोला-२५३ पैकी रिक्त पदे ७५, बुलढाणा रिक्त पदे-९२८ वाशिम जिल्हा परिषदे देखील पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) व (२) माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्हा परिषदेतील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील ३९ मंजूर पदांपैकी ३२ पदे भरलेली असून ०७ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मधील ३३ मंजूर पदांपैकी २८ पदे भरलेली असून ०५ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र विकास सेवा व्यतिरिक्त अन्य संवर्गातील गट-अ च्या ४२४ मंजूर पदांपैकी ३४५ पदे भरलेली असून ७९ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र विकास सेवा व्यतिरिक्त अन्य संवर्गातील गट-ब च्या २३६ मंजूर पदांपैकी १७४ पदे भरलेली असून ६२ पदे रिक्त आहेत.
(३) व (४) महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब मधील रिक्त पदे पदोन्नती / सरळसेवा /बदलीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र विकास सेवा व्यतिरिक्त अन्य संवर्गातील गट-अ आणि गट-ब ची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात येत आहे.

---

**राज्यात काही वर्षापासून एमबीबीएस अभ्यासक्रम असलेल्या खाजगी संस्था व अभिमत विद्यापीठांत शुल्कामध्ये सातत्याने वाढ होत असल्याबाबत**

**(४३) २५८४० (१८-११-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील काही वर्षापासून एमबीबीएस अभ्यासक्रम असलेल्या खाजगी संस्था व अभिमत विद्यापीठांत शुल्कामध्ये सातत्याने वाढ होत असून यावर्षीपासून नीट परीक्षा बंधनकारक करण्यात आली असूनही लाखो रुपये शुल्क भरु शकणाऱ्या विद्यार्थ्यांना एमबीबीएस ला प्रवेश घेणे शक्य असल्याचे माहे २२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांना खाजगी आणि अभिमतसाठी स्वतंत्रपणे अर्ज भरावा लागत असल्याने दोन्हीसाठी गुणवत्ता यादी एकच असेल की स्वतंत्र याबाबत विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात सवलत मिळण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी एकच ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१२-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे आणि ज्यांना खाजगी विनाअनुदानित व अभिमत विद्यापीठ महाविद्यालयाचे शैक्षणिक शुल्क परवडत आहे अशा विद्यार्थ्यांनी त्या महाविद्यालयांना जास्तीत जास्त पसंती दिलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) खाजगी विनाअनुदानित आणि अभिमत विद्यापीठ महाविद्यालयांचे प्रवेश हे नीट सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे झाले असले तरी प्रवेश पध्दती वेगळी होती. तसेच अभिमत विद्यापीठांच्या प्रवेशासंदर्भात मा.उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे प्रवेश शुल्कात सवलत आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी एकच ठेवणे शक्य झाले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापुर जिल्ह्यातील भिमा व सीना नदीवरील बंधाऱ्यावर दरवाजे बसविणेबाबत**

**(४४) २६०२८ (१८-११-२०१६). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात भिमा व सीना नदीमुळे मोठ्या प्रमाणात कार्यक्षेत्र सिंचनाखाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास भीमा व सीना नदीवरील विविध ठिकाणी पाणी अडविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून बंधारे बांधण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन दरवाजे बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-१२-२०१६) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दिनांक १७/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळांकडे वर्ग करण्यात आले आहे व महामंडळांकडे जमा होणारी पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या अनुषंगाने आवश्यक देखभाल दुरुस्ती कामांसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने नवीन दरवाजे बसविण्याची कार्यवाही क्षेत्रिय महामंडळ स्तरावरुन करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे राजापूर पंचायत समितीमार्फत मंजूर करण्यात आलेल्या घरघंटी अपंग लाभार्थ्यांना मिळण्याबाबत**

**(४५) २६१४० (१८-११-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे राजापूर पंचायत समिती मार्फत अपंग लाभार्थ्यांसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या घरघंटी दोन अपंग लाभार्थ्यांना मिळाल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधितांनी तक्रार केल्यानंतर त्या घरघंट्या जबरदस्तीने लाभार्थ्यांच्या घरासमोर नेऊन ठेऊन दोषी व्यक्तींनी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला असता पात्र अपंगांनी रीतसर रायपाटण पोलीस स्थानकांत तक्रार दिल्याने पंचायत समिती सदस्य आणि स्थानिक नेते हे बदनामी टाळण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांच्या पालकांवर दबाव टाकत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१२-२०१६) :** (१) होय.
(२) अशंत: खरे आहे.
(३) तालुकास्तरावर चौकशी समिती चौकशी करत आहे. दोषी अधिकारी/ कर्मचारी आढळल्यास यांच्यावर प्रशासकीय कारवाई करणेत येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक**
**शिक्षकांची बिंदूनामावली पूर्ण करण्याबाबत**

**(४६) २६१७० (११-११-२०१६). श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे रोस्टर (बिंदू नामावली) पूर्ण नसल्याने शिक्षकांची पदोन्नती व आंतरजिल्हा बदली प्रलंबित राहून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे सदर बिंदूनामावली पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास लेखी निवेदन दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बिंदू नामावली अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच बिंदू नामावली पूर्ण करुन प्रतिक्षा यादीत असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना देण्याबाबत तसेच त्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-११-२०१६) :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे रोस्टर (बिंदूनामावली) अद्ययावत करण्यासाठी मागासवर्गीय शिक्षकांची जात प्रमाणपत्रे टप्याटप्याने प्राप्त झाल्याने विलंब झालेला असून याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकामध्ये स्थागिती दिल्यामुळे कार्यवाही करता आलेली नव्हती. आता मा.न्यायालयात दाखल रिट याचिका निकाली निघालेली

आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे रोस्टर (बिंदू नामावली) सन २०११ ते २०१५ पर्यंतची अद्ययावत करुन पडताळणीसाठी दिनांक ५/११/२०१६ अन्वये सहायक आयुक्त (मावक), विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे पाठविलेली आहे.

(३) सद्य:स्थितीत आंतरजिल्हा बदलीने प्राप्त प्रस्तांवाची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शिक्षकांच्या पदोन्नतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागृहातील वातानुकूलीत यंत्रणा दुरुस्त असल्याबाबत**

**(४७) २६३८१ (१८-११-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागृहातील वातानुकूलीत यंत्रणा बंद असल्याने शवागारातील मृतदेहांची दूरवस्था झालेली असून परिसरात दुर्गंधी पसरल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील वातानुकूलीत यंत्रणा दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१२-२०१६) :** (१) भिवंडी उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागृहातील वातानुकूलित यंत्रणा दिनांक १७/८/२०१६ ते दिनांक २२/८/२०१६ या कालावधीत बंद होती, हे खरे आहे. तथापि, मृतदेहाची दूरवस्था झाली ही बाब खरी नाही. वातानुकूलित यंत्रणेअभावी मृतदेह खराब होऊ नये यासाठी दररोज बर्फाच्या लाद्या आणून शवागृहात ठेवल्या जात होत्या.

(२) सदर वातानुकूलित यंत्रणा दिनांक १७/८/२०१६ रोजी अचानक बंद पडल्यानंतर तात्काळ मेकॅनिकला बोलावून त्याची तपासणी करण्यात आली. शवागारातील बेवारस मृतदेह ताब्यात घेऊन जाण्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला कळविण्यात आल्यानंतर पोलीस स्टेशनमार्फत बेवारस मृतदेह ताब्यात घेऊन त्यांच्या अंत्यविधीची कार्यवाही पोलीस यंत्रणेमार्फत करण्यात आली आहे. सदर शवागृहातील वातानुकूलीत यंत्रणा दिनांक २२/८/२०१६ रोजी दुरुस्त करुन कार्यान्वित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा रुग्णालयात आहारतज्ज्ञा अभावी रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(४८) २६४३६ (१८-११-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयात गेल्या काही महिन्यापासून नियमित आहारतज्ज्ञा अभावी रुग्णांना असमतोल आहार मिळत असल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णांना दिला जाणारा आहार हा राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनआरसी) कंत्राटी आहारतज्ज्ञांकडून तपासणी केला जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील सर्वात मोठ्या रुग्णालयातील नियमित आहारतज्ज्ञांची नियुक्ती करण्यास विभागाकडून विलंब केला जात असून याबाबत शासनाने चौकशी करुन नियमित आहारतज्ज्ञांची नियुक्ती करण्याकडे टाळाटाळ करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) आहारतज्ञाची रिक्त पदे भरण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयातील आस्थापना विभागाकडून जाहीरात प्रसिध्द करण्यात आल्या असून रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणा-या डॉक्टरांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत**

**(४९) २६४३८ (१८-११-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या डॉक्टरांना राहण्याची किमान सुविधाही शासनाने उपलब्ध करुन दिली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकुवा तालुक्यातील चार प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर शौचालय नसलेल्या कुडाच्या घरात रहात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मांडवा, जांगठी, रोषमाळ, बिलगाव व झापी या प्राथमिक आरोग्य केंद्रात वीज नसल्याने बॅटरीच्या उजेडात रुग्णांना तपासावे लागत आहे तसेच प्राथमिक केंद्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची १७ पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सुविधा देण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१२-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे. तथापि, अक्कलकुवा व धडगाव या आदिवासी तालुक्यातील चार प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने बांधण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा, जांगठी, रोषमाळ, बिलगांव व झापी येथे विद्युत वितरण कंपन्यामार्फत वीज पुरवठा झालेला नसल्याने तेथे सोलर दिव्यांचा वापर करण्यात येत आहे. तसेच गट-अ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा निवड समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

**धुळे येथे मध्यवर्ती असलेले जिल्हा रुग्णालय पुर्णपणे बंद पडल्याबाबत**

**(५०) २६४३९ (१८-११-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथे शहराच्या मध्यवर्ती असलेले जिल्हा रुग्णालय मेडीकल कॉलेजचे रुग्णालय विभाजित झाल्यापासून पुर्णपणे बंद पडले असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेडीकल कॉलेज रुग्णालय धुळे शहरापासून सात किलोमीटर लांब असून या ठिकाणी रुग्णांना जाण्या-येण्याचा त्रास होत आहे याकारणास्तव धुळे शहरातील रुग्णलयात दोनशे खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी शासकीय मंजुरी असुनही या कामात विलंब होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ अन्वये धुळे येथे १०० खाटाचे सामान्य रुग्णालय व १०० खाटांचे स्त्री रुग्णालय मंजूर असून सदर आरोग्य संस्थासाठी पदनिर्मिती करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.